# मृत शेळीवर विष टाकून वाघाची शिकार

## आतापर्यंत 6 जणांना अटक ● मिशीसह 14 नखांचा शोध सुरू



### शवविच्छेदन अहवालाची प्रतीक्षा

वाघाच्या शिकार प्रकरणी सातव्या व्यक्तीला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. आतापर्यंतच्या तपासात या शिकारी आणि इतर राज्यातील शिकारी टोळ्यांचा कोणताही संबंध आढळून आला नसून तपास सुरू आहे. मृत शेळीवर विष ओतून वाघाला खाण्यासाठी ठेवण्यात आले होते. ते खाल्ल्याने वाघाचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. शवविच्छेदन अहवालानंतरच खरे कारण समोर येईल.

**अग्रीम सैनी, डीसीएफ**
**मेळघाट प्रादेशिक वन विभाग**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.4 )** – अंजनगावसुर्जी वनपरिक्षेत्रात 25 नोव्हेंबर रोजी वाघ मृतावस्थेत आढळून आला होता. विष प्राशन केल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. शिकारीसाठी मृत शेळीवर विष टाकतात. ती शेळी वाघाने खाल्ल्याने विषबाधा झाल्याचे वनविभागाच्या तपासात प्रथमदर्शनी समोर आले आहे.

याप्रकरणी वनविभागाच्या पथकाने आतापर्यंत 6 जणांना अटक केली आहे. मंगळवार 3 डिसेंबरच्या रात्री सातव्या आरोपीला संशयित म्हणून चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून चार नखे जप्त करण्यात आले आहेत. मात्र आतापर्यंत 12 नखे, मिशा आणि शरीराचे इतर अवयव गायब होते.

वाघाच्या पुढच्या पायाला 10 नखे आणि मागच्या पायाला 8 नखे असतात, एकूण 18 नखे असतात. शिकार केलेल्या वाघाच्या मृतदेहाजवळ दोन खिळे सापडले असून शिकारीकडून चार खिळे जप्त करण्यात आले आहेत.

# विद्यार्नीचा विनयभंग करणाऱ्या शिक्षकाची कारागृहात रवानगी




**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.4 )** – पथ्रोट पोलीस ठाणे हद्दीतील शिंदी बु.येथील जनता हायस्कूल येथील इयत्ता नववी मध्ये शिकत असलेल्या एका विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याची घटनेप्रकरणी पोलिसांकडून अटक आरोपी शिक्षकाची न्यायालयाने कारागृहात रवानगी केली.

पोलीस सुत्राकडुन मिळालेल्या माहीतीनुसार दि. 25 नोव्हेंबरला सकाळी प्रार्थना संपल्यावर सदर विद्यार्थीनीस आफीसमधील टेबल वरुन वाहनाची चाबी आणण्यास संदीप पाचपोर या शिक्षकाने सांगीतले. तिथे चाबी दिसली नाही असे सांगीतले असता पुन्हा तिला घेऊन ऑफीस मध्ये आणले व चाबी शोधण्याचा बहाणा करीत दोन्ही गाल ओढले. पुन्हा दुपारी मध्यंतराची सुटी झाली असता पेपर दाखवतो असे सांगुन शिक्षकखोलीत नेले पेपर दाखवतील ह्या आशेने गेली असता कोपर्यात नेऊन घट्ट कवट्यात मिठीत घेतले कशीबशी सुटका करुन खोली बाहेर पडली अश्या प्रकारे विनयभंग केला. दि.25 ला घरी येऊन आई–वडीलांना सांगीतले असता वडीलांनी मुख्याध्यापक सुटीवर असल्याने दि. 3 डिसेंबरला ही माहीती मुख्याध्यापकाला सांगीतली असता सर्व गावकर्याना माहीती पडताच सर्वानी शाळेत गोळा होऊन कलंकीत शिक्षकास आमच्या हवाली करा अशी भुमिका घेतल्याने संतप्त नागरिकानी गोंधळ घातला. सर्व प्रकाराची माहीती पोलीस ठाणे याना दिली व पोलीसाना पाचारण केले. आरोपी शिक्षकाच्या घरी ही माहीती समजताच शिक्षकाची पत्नी व भाऊ शाळेत पोहचल्यावर संतप्त जमावाने शिक्षकासह त्याच्या भावाच्या गाडीचीही तोडफोड केली. सदर घटनेचा तपास प्रभारी ठाणेदार सागर भाष्कर सह ठाणेदार गणेश मोरे यानी केला असता 74, 75 भारतीय न्याय संहिता 8/12 पोस्को गुन्हा दाखल केला. आज न्यायालयात हजर केले असता 18 डिसेंबर पर्यंत न्यायालयीन कोठडी दिली.

### अर्धा तासाचे सीसीटीव्ही फुटेज गायब

शिंदी बु. येथील शाळेत 7 ते 8 सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वीत आहेत. घटनेच्या दिवशी संपूर्ण शाळा परिसरातील घडामोडी कॅमेरामध्ये कैद आहे मात्र दुपारच्या सुमारास जिथे विद्यार्थीनीची छेड काढल्या गेली ते अर्ध्यातासाचे फुटेज डिलीट आहे. सबंधीत शिक्षकाच्या संशयास्पद हावभाव कॅमेऱ्यात दिसुन येत असल्याची माहिती शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

### गटशिक्षणाधिकारी चौकशीसाठी शाळेत दाखल

शिंदी बु. येथील या शाळेत विद्यार्थीनीचा झालेला विनयभंगा प्रकरणी गटशिक्षणधिकारी राम चौधरी, विस्तार अधिकारी राजीव खोजरे, केंद्र प्रमुख वर्षा लंगडे, विवेक मालगे यांनी या प्रकरणी मुख्याध्यापक, शिक्षकांचे बयानाची नोंद करत विद्यार्थीनीच्या तक्रारीची माहीती जाणून घेत शाळेतील विद्यार्थीनी सुरक्षा संदर्भातील बाबी तपासल्यास कार्यरत समित्यांची माहिती घेतली. या प्रकरणी योग्य ती चौकशी अहवाल वरिष्ठांना सादर केल्या जाणार असल्याचे गटशिक्षणाधिकारी राम चौधरी म्हणाले.

# स्पार रेन्ट शॉपमधील गुंतवणूक प्रकरणी गुन्हा दाखल

## अनेकांनी केली लाखोंची गुंतवणुक




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.4 )** – स्पार रेन्ट शॉपमध्ये गुंतवणूक करून अधिक परतावा देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याप्रकरणात अखेर 3 डिसेंबर रोजी रात्री चार जणांविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. यासंदर्भात सायबर ठाण्यात करण्यात आलेली तक्रार आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आली होती. आता याबाबत चौकशी झाल्यानंतर स्पार रेन्ट शॉपच्या नावावर अनेकांची फसवणूक झाल्याचे दिसून येत आहे. स्पार रेन्ट शॉपमध्ये अमरावतीसह राज्यभरातील अनेकांनी लाखो रुपये गुंतविले असून, याविषयीचा तपास आर्थिक गुन्हे शाखेने सुरु केला आहे.

स्पार नावाचे शॉप रेन्टवर घेऊन दररोज इनकम कमविण्याचे आमिष दाखविण्यात आले होते. एका लिंकच्या माध्यमातून अमरावती शहरासह राज्यभरात स्पार रेन्ट शॉपमध्ये अनेकांनी पैसे गुंतविले आहेत. गेल्या पंधरा दिवसांपूर्वी स्पार नामक पोर्टलवरील विड्राल थांबल्यानतंर गुतवणुकदारांचा गोंधळ उडाला. ऑनलाईन लिंकच्या माध्यमातून स्पार नामक शॉपमध्ये गुंतवणूक करणारे अमरावतीत हजारो नागरिक असण्याची शक्यता आहे. हा फाड असल्याची माहिती पुढे येताच, काही गुंतवणूकदारांनी पोलिस आयुक्तलयासह सायबर पोलिसांकडे धाव घेतली. त्यानंतर पोलिसांनी चौकशी करून गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरु केली होती.

> आर्थिक गुन्हे शाखेकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे राहील. त्यानुसार त्यांच्याकडून पुढील कारवाई होईल.
>
> **पुनित कुलट,**
> **पोलिस निरीक्षक, राजापेठ.**

### 3 लाख 94 हजाराने फसवणुक झाल्याची पहिली तक्रार

पोलिस सुत्रानुसार, आशीष विठ्ठल आकोटकर (रा गोपालनगर) यांनी स्पार फ्राडविषयीची तक्रार राजापेठ पोलिस ठाण्यात दिली आहे. स्पार रेन्ट शॉपच्या नावावर आशीष आकोटकर यांनी 3 लाख 94 हजार 154 रुपयांची गुंतवणूक केली असून, त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी अनिल जाधव, योगेश कठांळे, हाडोळे व कंपनीची संचालक कोमल सिंघानिया या चार जणांविरुध्द फसवणुकीची कलम 420 अन्वये गुन्हा नोंदविला आहे. स्पार फ्राड उघड झाल्यामुळे आता पोलिसांकडे तक्रारीची संख्या वाढण्याची शक्यता असून, ही फसवणुक कोट्यवधीच्या घरात जाण्याची शक्यता आहे.

### क्युआर कोडचा वापर करणे पडले महागात

स्पार शॉप रेन्टने घेऊन त्यावरील लिंक विविध नागरीकांना पाठवून, त्यांना गुंतवणुकीसाठी प्रोत्साहीत करणे आणि स्वतऱ्च्या क्युआर कोडचा वापर करणे, हे काही जणांना चांगलेच महागात पडले आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल केलेल्या आरोपींनी स्वतऱ्च्या मोबाईलमधील क्युआर कोडचा वापर केल्याचे पोलिस तपासात पुढे आले आहे.

### असे पसरले स्पारचे नेटवर्क

एका लिंकच्या माध्यमातून स्पार रेन्ट शॉपमधील गुंतवणुकीचा प्रसार झाला. अमरावतीमधील काही प्रतिष्ठीत नागरिकांनी स्पार नावाच्या लिंकच्या माध्यमातून पैसे गुंतविले आहे. तसेच त्यांनी अनेकांना लिंक पाठवून पैसे गुंतवीण्यासाठी प्रोत्साहीत केले. एका लिंकवरून एकाने गुंतवणूक केली, त्या पोर्टलवरील लिंक दुसऱ्याला पाठविणे, त्यानंतर त्याने गुंतवणूक केली, त्याची लिंक आणखी पुढील व्यक्तीला पाठविणे, असा काही प्रकार या फसव्या गुंतवणुकीचा होता. एचआयपीओबी स्पार ऑनलाईन.कॉम या नावाने असणारी ही लिंक ओपन केल्यानंतर पहिला पॅकेज 977 रुपयांचा होता, यामध्ये डेली इनकम हे 25 रुपये दिले आहे. त्याप्रमाणे 3300 पासून तर 1 लाखांपर्यंतचे स्टोर रेन्टवर घेऊन डेली इनकम हजारो रुपयात मिळत असल्याचे दाखविण्यात आले होते.

### बारा वर्षीय मुलीची छेडखाणी करणाऱ्याला चोप

**अमरावती–** रुग्णाच्या नातेवाईकांसोबत आलेल्या एका बारा वर्षीय बालिकेचा विनयभंग करणार्या मद्यपीला नागरिकांनी चांगलाच चोप दिला. ही घटना 4 डिसेंबर रोजी दुपारी दिड वाजताच्या सुमारास जिल्हा सामान्य रुग्णालयातील बाल रोग विभाग परिसरात घडली. याप्रकरणात पिडित मुलीच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी आरोपी शेख मतीन शेख अजीज (33, रा. लालखडी) याच्याविरुध्द गुन्हा नोंदवून, त्याला अटक केली आहे.

# ध्वजनिधी संकलनाला झाली सुरवात

**अमरावती** – जिल्ह्यातील ध्वजनिधी संकलनाला सोमवार, दि. 16 डिसेंबर रोजी सकाळी 10.30 वाजता सुरवात होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात ध्वजनिधी संकलन व माजी सैनिकांचा मेळावा होणार आहे. यावेळी माजी सैनिक, विधवा यांनी परिवारासह उपस्थित राहावे. असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# कामगाराच्या अंगावर टाकी पडून मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.4 )–** जीर्ण झालेली टाकी पाडण्याचे काम सुरु असताना, टाकी अंगावर पडून एका कामगाराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना बुधवार दिनांक 4 ला दुपारी 5 वाजताच्या दरम्यान वडाळा येथे घडली, या घटनेमुळे गावामध्ये एकच शोककळा पसरली.प्राप्त माहितीनुसार, आकाश नथूजी लोहिये (वय 30 वर्ष रा. मोर्शी) असे मृत्यू झालेल्या कामगाराचे नाव आहे. मागील काही दिवसापासून वडाळा येथे नवीन टाकीचे बांधकाम सुरू आहे1 त्यामुळे जीर्ण झालेली जुनी टाकी पाडताना अनावधानाने टाकी खाली दबून कामगार आकाश लोहिये याचा जागीच मृत्यू झाला.या घटनेची माहिती गावात पसरताच गावकऱ्यांनी घटनास्थळावर एकच गर्दी केली. काही वेळाने बेनोडा शहीद पोलिसांना घटनेची माहिती दिल्यानंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठून टाकी खाली दबलेल्या कामगाराचा मृतदेह जेसीबीच्या साह्याने काढण्यात आला. हे सर्व कामगार तालुक्या बाहेरील असल्यामुळे मृतदेह काढायला थोडा विलंब झाला. याच कामावर मृतकाचे वडील सुद्धा असल्याचे कळते. मृतकाचे शवविच्छेदन करण्यासाठी मृतदेह वरुडच्या ग्रामीण रुग्णालयात ठेवण्यात आला. घटनेचा तपास बेनोडा शहीदचे पोलीस करीत आहे.



### मृतकाच्या नातेवाईकांना मदत द्या!

या कामावर मोर्शी येथील कामगार असल्याचे सांगण्यात आले आहे. यातीलच एका कामगाराचा मृत्यू झाल्यामुळे त्याचे अख्खे कुटुंब उघड्यावर आलेले आहे. त्यामुळे एका गरीब मृतकाच्या कुटुंबाला ठेकेदारांकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी घटनास्थळावर गावकरी एकवटले होते. परंतु पोलिसांच्या मध्यस्थीनंतर गावकऱ्यांनी माघार घेतली. तरी ठेकेदारांनी मृतकाच्या कुटुंबाला दहा लाख रुपयाची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी अमरावती जिल्ह्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष अनुराग देशमुख यांनी केली आहे.

# नवनिर्वाचित आमदार व खासदारांचा सत्कार

**दर्यापूर–** तालुक्यातील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य संस्था असलेले शिवर – गोळेगाव सेवा सहकारी सोसायटीने दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार गजानन लवटे व खासदार बळवंत वानखडे यांचा शाल श्रीफळ पुष्पहार देऊन दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सुनील पाटील गावंडे यांच्या उपस्थितीत प्राध्यापक दिवाकर देशमुख अध्यक्ष सेवा खत सहकारी सोसायटी शिवार यांच्या हस्ते सत्कार केला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सुधाकर पाटील भारसाकळे, पंचायत समितीचे माझीउपसभापती संजय देशमुख, सेवा सहकारी सोसायटी अध्यक्ष बबनराव देशमुख, संचालक, अजय देशमुख आदी उपस्थित होते.




## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे सौ. ललिता अजय पंधरे यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणे प्रमाने,

मिळकतीचे वर्णन : मौजे–बेनोडा, शेत सर्वे क्र.28, सब डीवायडेड प्लॉट क्र. 12–अ, ता.आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे सौ. ललिता अजय पंधरे हे,सुधाकर शामराव धोटे आणि प्रफुल्ल सुधाकर धोटे यांच्याकडून सदर मिळकत विकत घेण्याचा सौदा झाला आहे. तदनंतर, त्यांनी PNB HOUSING FINANCE LIMITED. येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदी खत23/04/1986 रोजीचे दस्त क्र. 2095हे मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान, पतसंस्था/ राष्ट्रीयकृत/ सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय–निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या7 दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही हि विनंती.

शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती
मो. नं. 9823698745



महाराष्ट्र शासन

## मेळघाट वन्यजीव विभाग, परतवाडा

### जामली वन्यजीव परिक्षेत्र

खालील निर्देशीत केलेल्या कामाकरीता बी– । प्रपत्रातील सिलबंद निविदा मेळघाट वन्यजीव विभाग, परतवाडा अंतर्गत येत असलेल्या जामली (वन्यजीव) विभाग, परतवाडा अंतर्गत येत असलेल्या जामली वन्यजीव यांचे (दुरध्वनी ०७२२३–२२२६४३) हे महाराष्ट्र शासनाकडे योग्य त्या वर्गातील पंजीबध्द कंत्राटदाराकडुन निविदा मागवित आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदेसोबत भरावयाची रक्कम | कोऱ्या निविदा प्रपत्राची किंमत | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Repair to Forest Guard Quarter-1 Milind Borkar At Round Khongada Range Jamli Tq Chikhaldara Dist Amravati | 520325/- | 5203/- | 590 | 30 | शासकीय नियमानुसार |
| 2 | Repair to Forest Guard Quarter-2 At Round Khongada Range Jamli Tq Chikhaldara Dist Amravati | 318843/- | 3188/- | 590 | 30 | शासकीय नियमानुसार |
| 3 | Repair to Forest Guard Quarter-3 Surendra Dhande At Round Khongada Range Jamli Tq Chikhaldara Dist Amravati | 349311/- | 3493/- | 590 | 30 | शासकीय नियमानुसार |
| 4 | Repair to Forest Guard Quarter-4 At Round Khongada Range Jamli Tq Chikhaldara Dist Amravati | 389463/- | 3895/- | 590 | 30 | शासकीय नियमानुसार |
| 5 | Repairs & Chainlink Fencing with Gate to Forest Guard Quarter of ku. Saraswati Kalya Selukar At. Ambapati Tq. Chikhaldara Round-Jamli Range-Jamli Beat- Tembrusonda | 168550/- | 1686/- | 590 | 30 | शासकीय नियमानुसार |

कोऱ्या निविदेचा नमुना वनपरिक्षेत्र अधिकारी जामली (वन्यजीव) परिक्षेत्र यांचेकडुन निर्गमीत करण्याचे ठिकाण, दिनांक, निविदा भरुन सादर करावयाचे ठिकाण व दिनांक इत्यादी तपशिल खालीलप्रमाणे देण्यात आलेला आहे.

१) कोरे निविदा प्रपत्र निर्गमित करणे :– दि. ०५/१२/२०२४ ते दि. ११/१२/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत दुपारी १२.00 वाजे पर्यंत

२) भरलेल्या निविदा सादर करावयाची अखेरची दिनांक:– दि. ११/१२/२०२४ दुपारी २.00 वाजपर्यंत

३) निविदा उघडण्याची दिनांक व वेळ :– दि. १२/१२/२०२४ रोजी दुपारी ४.00 वाजता

४) ठिकाण :– वनपरिक्षेत्र कार्यालय जामली (वन्यजीव) परिक्षेत्र

५) तथापी निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी, जामली वन्यजीव परिक्षेत्र यांनी राखून ठेवला आहे.

६) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी जामली वन्यजीव परिक्षेत्र यांनी राखून ठेवला आहे त्यांचा निर्णय सर्व निविदाधारकासाठी अंतिम व बंधनकारक राहील.

७) निविदा संबंधी सविस्तर अटी व शर्ती या विभागाचे सुचनाफलकावर दिनांक ०५/१२/२०२४ पासून पहावयास मिळेल.

विमाका/अम/जाहि / ७९८ / २०२४–२०२५

वन परिक्षेत्र अधिकारी
जामली वन्यजीव परिक्षेत्र


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक –श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# बहिरम जत्रेत सजणार का तमाशाचा फड?





## बच्चु कडूंच्या पराभवानंतर काय राहणार चित्र

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट( दि.4 )** – सलग दोन महिने सुरु राहणार्या मोठ्या बहिराम जत्रेत, पुन्हा तमाशातील नर्तकीच्या पायातील घुंगरुचा आवाज ऐकता येणार अशी दाट शक्यता आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत बच्चु कडुंच्या झालेल्या पराभवानंतर करमणुकीच्या मनोरंजनाचा मूड बदलण्याची शक्यता आहे.

मध्य प्रदेशच्या सीमेवर वसलेले बहीरमबाबाचे मंदिर कोट्यावधी भक्तांचे श्रद्धास्थान आहे. भक्तांनी केलेला नवस पूर्ण होत असल्याने नवसाला पावणारा बहीरमबुआ अशी ओळख आहे. श्रद्धाळु नवस बोलतो तो पूर्ण झाल्यावर भेट चढवतो. कोंबडी, बकरी, बोकड मंदिराच्या आवारात आणली जात आणि सोडली जाते. काही वर्षांपूर्वी मंदिरात बोकडाचा बळी देण्याची प्रथा होती. ती संत गाडगेबाबांच्या आवाहनाने बंद झाली.

संपूर्ण राज्यात तमाशा प्रसिद्ध असुन जर या वेळी बहिराम यात्रा येथे तमाशा आणला गेला तर पुर्वीचा घुंगराचा आवाज घुमणार. अध्यात्म, तत्वज्ञानासह करमणुकीचा दुहेरी संगम ठरेल. थंड दिवसांमध्ये, रात्री उशिरापर्यंत बहिरम यात्रा सुखद होईल यात शंका नाही. तमाशाच्या माध्यमातून यात्रेकरुना ढोलकी आणि घुंगराया लयावर लावणीचा स्वर ऐकायला मिळेल. यात्रेत उभारलेल्या दुकानांचे उत्पन्नही वाढणार.बहराम यात्रा पारंपारिकपणे गेल्या अनेक दशकांपासून अव्याहत चालू आहे. दरवर्षी ही यात्रा थंडीत सुरू होते. बहिरम यात्रेत तमाशा करमणूक म्हणून समाविष्ट करण्यात आला आहे. काही विरोधी –सामाजिक घटक तमाशाबद्दल गैरसमज पसरवतात. तमाशाच्या कमतरतेमुळे बहिरम यात्रेचा आत्मा गायब झाला.

मा आमदार बच्चू कडू यांनी तमाशा बंद केला आणि शंकरपट, कबड्डी स्पर्धा सुरू केली. बहिरम यात्रा मध्ये, पुन्हा तमाशा फड सुरु करण्यास स्वाक्षरी मोहिमेची सुरूवात करण्यात आली आहे. करमणुकीचा तमाशा ही महाराष्ट्राची लोक कला संस्कृती आहे. स्वाक्षरी मोहिमेने आज ही संस्कृती पिढीला सादर करण्यास सुरवात केली आहे. मा.आमदार बच्चु कडू यांनी तमाशाला बहिरम यात्रा येथून काढून टाकले. त्यांच्या पराभवानंतर, तमाशा परत बहिरम यात्रा येथे आणण्याचा प्रयत्न सुरू झाला असल्याचे समजते.

### विशेष हंडी चव

यात्रामध्ये हजारो भक्त नवीन वर्ष साजरा करण्यासाठी येतात. या यात्रे मांसाहारी मटन स्पेशल हंडी ही पसंतीची आहे. मटण, कोंबड्याची भाजी आणि चुलीवर बनविलेली ज्वारी, बाजरी पोळी येथे मिळते. मातीची भांडी, नवीन आकारात केलेली मातीची भांडी, तवा, चहा, कप, सूरई, माठ, अन्न शिजवण्याकरीता हंड्या मातीच्या येथे मिळतात. राहुटीतील रोडगा पार्टी देखील येथे विशेष असते.

# पोलीस उपनिरीक्षक सुधीर विरखडे यांचा सपत्नीक सत्कार

## सेवानिवृत्ती निमित्त बेनोडा शहीद पोलीस स्टेशनचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.4 )** – तालुक्याअंतर्गत बेनोडा शहीद पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष पोलीस उपनिरीक्षक सुधीर मारोतराव विरखडे हे 39 वर्षाचे प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानाने दिनांक 30 नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांचा भावपूर्ण निरोप समारंभ पोलीस स्टेशनच्या परिसरात साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पोलीस स्टेशनचे ठाणेदार ज्ञानोबा फड तर प्रमुख अतिथी म्हणून शाहीद स्मृती जुनिअर कॉलेज बेनोडाचे प्राचार्य संजय ठाकरे, ज्ञानमाता विद्यालय रोशनखेडाचे मुख्याध्यापक गोपाल काळे, तसेच ग्रामपंचायत बेनोडा सरपंच रजनी कुबडे, वरुड तालुका पोलीस पाटील संघटनेच्या अध्यक्ष सुवर्णा घारड ह्या होत्या. सत्कारमूर्ती सुधीर विरखडे यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ पुष्पगुच्छ व भेट वस्तु देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला कार्यक्रम परिसरातील पोलीस पाटील, पोलीस अधिकारी व कर्मचारी, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश हंबर्डे तर आभार प्रदर्शन संजीवनी हरले यांनी केले.

# कारागृहातील बंद्यांसाठी आध्यात्मिक प्रवचन

**अमरावती** – सकल जैन समाज संस्था आणि श्री महाकाली माता शक्तीपीठ यांच्यातर्फे अमरावती येथील मध्यवर्ती कारागृहात आध्यात्मिक प्रवचन सोमवार, दि. 2 डिसेंबर रोजी पार पडले.

अपर पोलीस महासंचालक, कारागृह व सुधारसेवा प्रशांत बुरडे आणि कारागृह उपमहानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा स्वाती साठे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम घेण्यात आला. सकल जैन समाज संस्थेचे सचिव अभिनंदन पेंढारी यांनी संस्थेचा अल्प परिचय करुन दिला. विविक्त श्री माताजी यांच्या आध्यात्मिक कार्याविषयी माहिती दिली. विविक्त श्री माताजी यांनी बंद्यांनी आहार, आचरण, विचाराबाबत मार्गदर्शन केले. महाकाली शक्तीपीठाचे शक्तीजी महाराज यांनी कारागृहातून सुटल्यानंतर स्वतऱ्चा रोजगार करुन अनिष्ठ व्यक्ती आणि व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. कारागृह अधीक्षक किर्ती चिंतामणी यांनी आध्यात्मिक विचार आचरणात आणून वाईट प्रवृत्तीपासून दूर राहण्याचे सांगितले. कारागृहातील 270 बंद्यांनी यात सहभाग घेऊन सकारात्मक प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे आयोजन ललित मुंडे, संजय घोलप यांनी केले. कार्यक्रमासाठी शक्तीजी महाराज यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. यावेळी तुरुंगाधिकारी शामराव गिते, कारागृह शिक्षक मिलींद बनसोड, संजय घोलप व ललित मुंडे, सुभेदार गोपाल कचरे, श्रीकृष्ण लांजेवार उपस्थित होते.

## जादूटोण्याच्या संशयावरून घराची तोडफोड

**अमरावती** – तिवसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या 36 वर्षीय महिलेवर जादूटोणा केल्याचा संशय आल्याने तिच्या घराच्या वरती ठेवलेल्या पाण्याच्या टाकीची व स्लॅबची तोडफोड करण्यात आली. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आकाश दिवे, योगेश दिवे व एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# शपथविधी सोहळ्यासाठी अनुलोमचे कार्यकर्ते मुंबईकडे रवाना

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.4 )**– महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची लोकनेते देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा शपथ घेणार आहेत. मुंबई येथील आझाद मैदानात हा भव्य दिव्य सोहळा 5 डिसेंबर ला पार पडणार आहे. या शपथविधी सोहळ्याचे साक्षीदार होण्याकरिता अनुगामी



लोकराज्य अभियान (अनुलोम)चे धामणगाव रेल्वे विधानसभा भागातील कार्यकर्ते मुंबईसाठी रवाना झाले आहे. अनुलोम धामणगाव रेल्वेचे भाग प्रमुख प्रज्वल घाटोळ, प्रशांत सिसोदिया, अमोल आखरे, भूषण धुवे, सागर वनवे, योगेश झिमटे, भारत घाटेकर, जगदीश होले, चैतन्य रिखे, सुरेखा अडसपुरे, राधाली धुवे, गीता गुल्हाने, निलिमा कडू, आचल प्रधान, प्रांजली पडोळकर, कुलदीप जाधव, राहुल लाडे, सागर गिरासे,संकेत येवतिकर, संकेत मोरे, अक्षय गडलिंग, अक्षय सोनवणे, प्रदीप घाटोळ, अनिकेत आखरे, रणजित चव्हाण यांसह अनेक कार्यकर्ते शपथविधीसाठी रवाना झाले.

# न. प. वतीने 'घर घर संविधान' कार्यक्रमातून जागर

## कर व प्रशासकीय अधिकारी प्रियंका खोरगडे यांनी विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.4 )**– भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता तसेच संविधानाची मूल्ये शालेय महाविद्यालयीन तसेच देशाचे भावी नागरिक यांच्यापर्यंत पोहोचावी यासाठी राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे तसेच ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्था, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानसभा अशा सर्व ठिकाणी भारतीय संविधानास 75 वर्षे पूर्ण झाल्या निमित्त सन 2024-25 या अमृत महोत्सवी वर्षात संविधान जागृत अमृत महोत्सव 'घर घर संविधान' साजरा करण्यात आला.



दि.26 नोव्हेंबर 1949 रोजी आपण संविधान स्वीकृत करून दिनांक 26 जानेवारी 1950 पासून संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. संविधानाचे महत्त्व अनेक स्तरांवर असून भारतीय संविधानात समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व नागरिकांना सामाजिक आर्थिक आणि राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास श्रद्धा व उपासना यांचे स्वातंर्त्य, तसेच दर्जा व संधीची समानता प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकात्मता, बंधुता या मूल्यांचा विचार केलेला आहे. संविधान हे एक जिवंत दस्तऐवज आहे, जे देशाच्या विकासात आणि नागरिकांच्या जीवनाच्या गुणवत्तेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते पत्र जाहीर झाले आहे. त्यांचाच एक भाग म्हणून दर्यापूर नगर परिषदेच्या वतीने नगर परिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्याकारी नंदू परळकर यांच्या मार्गदर्शनात व कर व प्रशासकीय अधिकारी प्रियंका खोरगडे यांच्या सहभागातून नगर परिषद मुलींची उर्दू शाळा क्र. 3, दर्यापूर नगर परिषद मुलांची शाळा मराठी शाळा क्र. 9 बाभली, नगर परिषद मुलींची शाळा क्र. 10, नगर परिषद अभ्यासिका दर्यापूर या ठिकाणी संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त 'घर घर संविधान' कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी विद्यार्थ्यांकडुन संविधान उद्देशिकेचे वाचन दररोज केले जाते. कर अधिकारी खोरगडे यांनी संविधानाचे महत्त्व समजावून सांगितले. 26 नोव्हेंबर 2024 ते 26 जानेवारी 2024 या कालावधीत रांगोळी, चित्रकला, निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. प्राथमिक आणि माध्यमिक शाळांसह सर्व प्रकारच्या व्यावसायिक, बिगर व्यावसायिक महाविद्यालये, शैक्षणिक संकुले, शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळा, तसेच शासन मान्यताप्राप्त अनुदानित, विनाअनुदानित, स्वयं अर्थसहाय्यित शाळा, आश्रमशाळा, वसतिगृहे येथे 'संविधान अमृत महोत्सवांतर्गत विविध उपक्रम घेण्यात येणार आहे.

# पुरोगामी माध्यमिक विद्यालयात ज्ञान, विज्ञान महोत्सव

**महासागर प्रतिनिधी**

**भातकुली, ( दि.4 )**– तालुक्यातील आसरा येथे सोमवारी (दि.2) पुरोगामी माध्यमिक विद्यालय येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, त्यांना सायन्स मध्ये आवड निर्माण व्हावी, या दृष्टीने शाळा स्तरावर विज्ञान विषयाचे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. शाळेतील उपक्रमशिल विज्ञान शिक्षक तथा भातकुली तालुका विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष गोपाल वडतकर हे या कार्यक्रमाचे आयोजन करत असतात. यावर्षी सुद्धा विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सोमवार(दि.2) ला विज्ञान प्रतिकृती बनविण्याची कार्यशाळा, मंगळवारी(दि.3) रोजी वैज्ञानिक



रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा 4 ते 5 डिसेंबर 2024 ला रमन सायन्स सेंटर नागपूर द्वारे आयोजित फिरते विज्ञान प्रदर्शनी चे आयोजन केले आहे. सोबतच विविध प्रयोगाचे प्रात्यक्षिक शुभम अजमीरे नागपूर व त्यांच्या टीम द्वारे करण्यात येईल, तरी या सुवर्ण संधी चा फायदा परिसरातील विद्यार्थी व विज्ञान प्रेमींनी घ्यावा असे आवाहन शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी केले आहे.

# कौशल्य विकास प्रोग्राम अंतर्गत विद्यार्थ्यांना वर्कबुकचे वितरण



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.4 )**– स्थानिक शिवाजी उच्च माध्यमिक शाळा मोर्शी येथे विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशील मानसिकता आणि कौशल्य विकास करण्याकरिता महाराष्ट्र शासनाद्वारे उद्यम लर्निंग फाउंडेशन या संस्थेमार्फत सक्षम प्रोग्राम सुरू करण्यात आला आहे.

सदर प्रोग्राम अंतर्गत प्रत्येकी पाच पाच विद्यार्थ्यांचे गट पाडण्यात आले व प्रत्येक गटाला वर्कबुक वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख, तसेच पर्यवेक्षक मिलिंद ढाकुलकर, उद्धव गिद, सहा शिक्षक राजेश मुंगसे तसेच सक्षम प्रोग्राम प्रभारी एस .डब्लू राजस यांची प्रमुख उपस्थिती होती. यानंतर विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख व प्रभारी राजस यांनी सक्षम प्रोग्राम विषयी सविस्तर माहिती दिली.

# ढगाळ वातावरणामुळे शेतकरी धास्तावले



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी,( दि.4 )** – सध्या सगळीकडे ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. त्यात हवामान खात्याने अवकाळी पावसाचा इशारा दिल्यामुळे रब्बी हंगामातील तुर, हरभरा, ज्वारी पिकाला फटका बसण्याची शक्यता आहे. त्यातच शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे असुन परिसरातील शेतकरी चांगलेच धास्तावले आहे.

गेल्या वर्षी रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी हरभरा व तुर पिकांची पेरणी केली होती. त्यानंतर मात्र अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने रब्बी हरभरा व तुरीचे पीक शेतकऱ्यांच्या हातातून गेले होते. शासनाने तुटपुंजी मदत केली होती तर काही शेतकऱ्यांनी नुकसान भरपाईची रक्कमही मिळाली नव्हती. तसेच गेल्या वर्षी धुके व ढगाळ वातावरणामुळे तूर पिकांवर रोगाचा प्रादुर्भाव झाला होता. आता हवामानात बदल झालेला आहे. शिवाय 10 डिसेंबर पर्यंत ढगाळ वातावणासह अवकाळी पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पिकांची चिंता लागली असुन शेतकऱ्यांसमोर मोठे आस्मानी संकट उभे आहे. ढगाळ वातावरणामुळे पिकांवर अळी व अन्य रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. तालुक्यातील अंजनगाव बारी परिसरातील दिडशे हेक्टर रब्बी पेरणी झाली त्यामध्ये तुर व हरभरा पिक बहरलेल्या अवस्थेत आहे.

# संगीत रजनीने रसिक प्रेक्षकांना केले मंत्रमुग्ध

## कौडण्यपूर यात्रेत रंगारंग कार्यक्रम सादर

**महासागर प्रतिनिधी**

**कौंडण्यपूर,( दि.4 )**– मैफिल स्वरांची या संगीत रजनीने उदघाटन सोहळ्यामध्ये एकच रंगत आणली. या मैफिलीला सुप्रसिद्ध गायक राहुल तायडे यांनी आपल्या सुमधुर आवाजाने रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. तसेच सुप्रसिद्ध गायिका दीपालीताई पांडे यांनी सुद्धा आपल्या संगीतमय शैलीतून रसिक प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी स्वागताध्यक्ष रविराज देशमुख यांनी प्रेक्षक म्हणून संपूर्ण संगीत रजनीचा आनंद घेतला.

कौंडण्यपूर यात्रेमध्ये तीन दिवस विविध रंगारंग कार्यक्रमाने संपन्न झालेल्या महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या



पुरातन राजधानीचा नामक %%अंबा रुख्मिणी महोत्सव 2024%% चा उदघाटन समारंभ दिनांक 29 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 7 वाजता मोठ्या जल्लोषात संपन्न झाला. या महोत्सवाचे उदघाटन रविराज देशमुख (प्रदेश उपाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी) यांच्या हस्ते पार पडले. यावेळी व्यासपीठावर सुधीर दिवे (माजी उपजिल्हाधिकारी व सल्लागार मा. केंद्रीय मंत्री जलसंपदा, नदी विकास व गंगा पुनरुज्जीवन), शिल्पा हांडे (मा. सभापती, पं. स. तिवसा), डॉ. मयूर कळसे (तहसिलदार तिवसा), गायत्री देशमुख (कोषाध्यक्ष, महाराष्ट्र ग्राम दर्पण), वर्षा गाडगे (महिला जिल्हाध्यक्ष, ओबीसी मोर्चा अमरावती), प्रेमदास राठोड, (सरपंच, गट ग्रामपंचायत कौंडण्यपूर), तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गजाननराव बांबल, श्री अंबा रुक्ख्मनी सांस्कृतिक महोत्सव समितीचे दिनेशराव ठाकरे, अंकुशराव देऊळकर (उत्सव समिती अध्यक्ष), अमोल पुंडेकर (अध्यक्ष, श्री रुख्मिणी सहकार्य युवक मित्र मंडळ) अमोलराव शेंडे, संतोषराव मठिये (मारडा), संतोषराव साठवणे (जहागीरपूर), अतुल ठाकरे (श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर विश्वस्त), श्रीरामजी केवदे (मा. उपसरपंच), बाळू ठाकरे, दिलीपराव मेहकर, आशिष डुबे आदींची उपस्थिती होती.

नयनरम्य बोटिंग स्पर्धेनंतर संपन्न झालेल्या या उदघाटन सोहळ्याच्या प्रास्ताविकातून अक्षय पुंडेकर यांनी अंबा रुख्मिणी महोत्सव 2024 ची रूपरेषा मांडली. गेल्या 4 वर्षाचा कार्यकाळ आणि विविध रंगारंग कार्यक्रम आयोजित करून या महोत्सवाने कौंडण्यपूरच्या कार्तिक यात्रेमध्ये विशेष भर घातली. आणि आता दिवसेंदिवस यात्रेचे स्वरूप वाढत असून पुढील काळात हा महोत्सव आणखी मोठमोठ्या कार्यक्रमांचे आयोजन करणार असल्याचे प्रतिपादन अक्षय पुंडेकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे संचालन प्रा. रंजनसेन शेंडे व सौ. अश्विनी विलायतकर यांनी केले.

### यात्रेत भर घालण्यासाठी हा महोत्सव एकमेव माध्यम- रविराज देशमुख

कौडण्यपूर ची यात्रा ही विदर्भात प्रसिध्द असून पूर्वी ही यात्रा एक महिन्याची राहत होती, कालांतराने ही यात्रा कमी कमी होऊन आता 15 दिवसांवर येऊन ठेपलेली आहे. याच अनुषंगाने ही यात्रा आणखी वाढावी, या यात्रेत मनोरंजनसोबतच प्रबोधन सुद्धा व्हावे, तसेच स्थानिक कलावंतांना हक्काचे व्यासपीठ मिळावे. याच पार्श्वभूमीवर दरवर्षी साजरा होणारा महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या पुरातन राजधानीचा नामक अंबा रुक्मिणी महोत्सव 2024 हे एकमेव माध्यम आहे. असे प्रतिपादन रविराज देशमुख यांनी व्यक्त केले.